महाराष्ट्र शासन

आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई यांचे कार्यालय

विषयः- मळीचा वापर

वाचा:- १) या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक एमएलएस ११८५/पशुखाद्य/११-अ, दि. २५-२-१९८८.
२) या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक एमएलएस ११८९/३७५४/११-अ, दि. ६-१-१९९०.
३) या कार्यालयाचे परिपत्रके क्रमांक एमएलएस ११९५/५१०९७/५(अ), दि. ५-२-१९९६.

**परिपत्रक**

क्र. एमएलएस ११२००२/३११/४३/५-अ. मुंबई, २६ ऑगस्ट, २००२.

राज्यातील काही घटक पशु-पक्षी खाद्य निर्मितीसाठी नवीन एम-२ अनुज्ञप्ती मंजूर करण्यासाठी अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांच्याकडे अर्ज करतात काही एम-२ अनुज्ञप्तीधारक मंजूर असलेल्या मळीच्या कोटयात वाढ करण्याकरिता किंवा एम-२ अनुज्ञप्तीचे नुतनीकरण करण्यासाठी अर्ज प्राप्त होतात अशा अर्जांवर कार्यवाही करण्यापूर्वी सदर घटक अस्तित्वात/कार्यान्वित आहे किंवा नाही याची खात्री करावी.

मळीचा प्रामुख्याने वापर आसवनीमध्ये मद्यार्क निर्मितीसाठी होतो. मात्र काही घटक पशु-पक्षी खाद्य निर्मितीसाठी मळीचा वापर करण्याकरिता एम-२ अनुज्ञप्ती प्राप्त करुन घेतात. आणि सदर मळी अनधिकृतरित्या इतर राज्यांत विकली जात असल्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी सदर प्रकरणी सर्व अधीक्षकांचे लक्ष या कार्यालयाचे संदर्भिय परिपत्रकाकडे वेधण्यात येत आहे. नवीन एम-२ अनुज्ञप्तीस मंजूरी देण्यास व कार्यान्वित असलेल्या अनुज्ञप्तीवरील मळीचा कोटा वाढविण्या बाबतचे प्रस्ताव सादर करताना अधीक्षकांनी उपरोक्त तिन्ही परिपत्रकात दिलेल्या सूचनाप्रमाणेच प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने सादर करणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

घटकाने वर्षभरात किती मळी उचलली व त्यापासून किती पशुखाद्य तयार केले व त्याची विक्री कोणास केली याबाबतची माहिती योग्य आहे अशी खात्री पटल्यास पुढील कार्यवाही करण्यात यावी.

संबंधित दुय्यम निरीक्षक/निरीक्षक यांनी प्रत्येक महिन्याला एम-२ अनुज्ञप्ती घटकास प्रत्यक्ष भेट देऊन निरीक्षण करावे. कांही आक्षेपार्ह बाब आढळल्यास ती अधीक्षकांमार्फत आयुक्त कार्यालयाच्या निदर्शनास आणावी.

(ए. रामकृष्णन)
आयुक्त.

प्रति,

१) सर्व जिल्हाधिकारी सस्नेह,
२) सर्व विभागीय उप आयुक्त,
३) सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,
४) या कार्यालयातील सर्व राजपत्रित अधिकारी,
५) या कार्यालयातील सर्व कार्यासन अधिकारी,
६) अभिलेख शाखा ५ प्रती.